नि.फौ.प्र.क्र.४/२०२०
शासन ..वि.. लालचंद
निशाणी क्र. २४

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४

मी शपथेवर खरे सांगते की,

नावः **प्रमिला वसंत लोहार** वय ६१ वर्ष, धंदा– शेती,

राहणार– तळवेल, ता.भुसावळ.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती आर.आर.चव्हाण यांच्याद्वारे–**

१. सन २०१९ मध्ये १५ ऑगस्ट झाल्याच्या नंतर ५ दिवसाने घटना घडली होती. त्यादिवशी मी वरणगांवच्या सेंट्रल बँकेत सबसीडीचे पैसे काढण्यासाठी गेली होती. मी आरोपीच्या बाजूला बसली होती. मी माझे कागदपत्र पिशवीत ठेवत असताना मोठा स्पोट झाला. गावतले सर्व लोक काय झाले असे म्हणून पळत आले. आरोपीच्या हातातून बंदूक खाली पडली होती व माझ्या दोन्ही पायाला एकच गोळी लागली होती. गोळी लागल्यामुळे माझ्या पायातून रक्त वाहू लागले. मी उठण्याचा प्रयत्न करत होते परंतु मला उठता देखील येत नव्हते. स्पोटामध्ये चार लोकाना लागले होते. त्यांची नावे कलाबाई, शोभाबाई, यशवंत पाटील, जैस्वाल अशी आहेत. त्यानंतर अॅब्युलन्सच्या गाडीतून मला वरणगांवच्या सरकारी दवाखान्यात नले होते. त्याच दिवशी मला पुन्हा जळगावच्या सरकारी दवाखान्यात नेले. दोन दिवसानंतर मला राजेंद्र अग्रवालच्या दवाखान्यात नेण्यात आले. तेथे माझ्यावर ऑपरेशन झाले. राजेंद्र अग्रवालच्या दवाखान्यात पोलीस आले होते. तेथे पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. आरोपीच्या हातातून बंदूक खाली पडली होती त्यामुळे स्पोट झाला होता. मी आरोपीला ओळखते. तो आज न्यायालयात हजर आहे. मी बंदूक पाहिल्यास ओळखू शकते. आता मला वस्तू अ वरील डबल बॅरल गन दाखविण्यात आली. ती तीच आहे. माझे कपडे रक्ताने भरलेले होते.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. धिरज पाटील यांचेद्वारे**–

२. सेंट्रल बॅक वरणगाव येथील माझा खाते क्रमांक मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, सेंट्रल बँक वरणगाव येथे माझे खाते नाही. वरणगांव सेंट्रल बँकेत तीन कॉऊंटर आहेत. माझे काम शेवटून २ नंबरच्या कॉऊंटरवर होते. हे खरे नाही की, ज्या कॉऊंटरवर माझे काम होते त्या कॉऊंटर पासून बँकेचा दरवाजा ३० फुट अंतरावर आहे. माझ्या मते ते अंतर अंदजे २० फुट असेल. हे खरे नाही की, नेमका स्पोट कुठे झाला हे मला उमजले नव्हते. हे खरे नाही की, मोठा आवाज हा बँकेच्या बाहेर झाला होता. हे खरे नाही की, स्पोट झाला तेव्हा मी कॉऊंटर जवळ ऊभी होते. स्पोट झाला तेव्हा चार लोकांना गोळया लागल्या होत्या. एक गोळी माझ्या एका पायाला लागली नंतर तीच गोळी माझ्या दुस–या पायाला लागली नंतर तीच गोळी इतर लोकांना लागली.

३. बंदुकीच्या रंगावरुन मी बंदुकीची खुन लक्षात ठेवली होती. हे खरे नाही की, बँकेत मला कोणतीही गोळी लागली नव्हती. हे खरे नाही की, आरोपीच्या बंदुकीतून कोणतीही गोळी सुटली नव्हती व कोणताही स्पोट झाला नव्हता. हे खरे नाही की, आजू बाजूच्या लोकांच्या सांगण्यावरुन मी आरोपीच्या बंदुकीतून गोळी निघाल्याचे सांगत आहे. हे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**फेरतपास**– काही नाही.

वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by PAWAR GAJANAN BALAJI
Date: 2026.02.05 13:48:42 +0530

(जी.बी. पवार)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भुसावळ
दि.०५.०२.२०२६

समक्ष

Digitally signed by PAWAR GAJANAN BALAJI
Date: 2026.02.05 13:48:48 +0530

(जी.बी. पवार)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भुसावळ
दि.०५.०२.२०२६